ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 12 | ISSUE - 1 | SEPTEMBER - 2025

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# 74 वी घटनादुरुस्ती : एक अभ्यास



**प्रा. डॉ. लक्ष्मण बाबाराव यादव**
राज्यशास्त्र विभाग,
बाबासाहेब देशमुख पारवेकर महाविद्यालय पारवा.

**प्रस्तावना :-**

भारतामध्ये स्थानिक स्वराज्य संस्था सुदृढ करून त्यांना घटनात्मक दर्जा प्राप्त करून देण्यासाठी 73 वी व 74 वी घटनादुरुस्ती अनुक्रमे ग्रामीण व शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांना बळकटी देण्यासाठी 1992 मध्ये संमत करण्यात आल्या. 74 वी घटनादुरुस्ती ही भारतातील नगरपालिका शासनाचे लोकशाहीकरण, सक्षमीकरण व विकेंद्रिकरण यासाठी एक ऐतिहासिक टप्पा मानली जाते. या घटना दुरुस्तीने नागरिक स्थानिक स्वराज्य संस्थांना घटनात्मक दर्जा प्राप्त झाला. त्यामुळे नागरिक स्थानिक स्वराज्य संस्थांना संविधानामुळे फार मोठे संरक्षण प्राप्त झाले.या घटना दुरुस्तीने राज्य शासनावर स्थानिक स्वराज्य संस्थेच्या राज्यकारभारात हस्तक्षेप करण्यास प्रतिबंध घालण्यात आला. राज्यघटनेतील तरतुदीचे पालन राज्य शासनाला करावेच लागते. व तसेच नागरिक स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका नियमित व वेळेवर घेणे बंधनकारक ठरवण्यात आले. व तसेच ही जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आली. त्यामुळेच मुदतपूर्व स्थानीक स्वराज्य संस्थांना बरखास्त करणे, प्रशासक नेमणे,निवडणुका न घेणे, अशा राज्य शासनाच्या मनमानी राज्यकारभारावर संविधानामुळे प्रतिबंध घातला गेला. आर्थिक दृष्ट्या नागरिक स्थानिक स्वराज्य संस्था या सक्षम बनू लागल्या 74 व्या घटनादुरुस्तीने नागरिक स्थानिक स्वराज्य संस्थेसाठी वित्त आयोगाची स्थापना करण्यात येऊ लागली. त्यामध्ये नगरपालिका महानगरपालिका नगरपंचायत नगरपरिषद यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा व्हायला सुरुवात झाली. त्यांच्या आर्थिक व्यवहाराची लेखा व लेखापरीक्षने होऊ लागले. आणि म्हणूनच 6नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या व्यवहारातील भ्रष्टाचाराला प्रतिबंध बसलेला असून, महिलांना नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेत 33 टक्के आरक्षण देण्यात आले. अध्यक्ष, महापौर या पदावरही महिला सहभागी होऊ लागल्या 12 व्या परिशिष्टामध्ये 18 अधिकार समाविष्ट करण्यात आले.त्यामध्ये शहर नियोजन, पाणीपुरवठा, रस्ते, झोपडपट्टी प्रश्न,आरोग्य,पुल, स्वच्छता, असे महत्त्वाचे प्रश्न त्यात समाविष्ट करण्यात आले. म्हणूनच 74 वी घटनादुरुस्ती हे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेसाठी एक महत्त्वाचा टप्पा मानली जाते.

### 74 वी घटनादुरुस्तीची पार्श्वभूमी :-

भारतात शहरीकरणाचा वेग झपाट्याने वाढत असल्यामुळे, शहरी भागात अनेक समस्या निर्माण होऊन,त्या समस्येचे स्वरूप गंभीर होत चाललेले आहे. म्हणूनच नगर प्रशासन अधिक कार्यक्षम करण्याची गरज निर्माण झाली आहे. 1992 म्हणजेच 74 व्या घटना दुरुस्तीच्या अगोदर,स्थानिक पातळीवरील विकासकामांसाठी स्थिर संरचना अस्तित्वात नव्हती. नगरपालिका संस्थांमध्ये राजकीय अस्थिरता, निधीअभावी कामकाज ठप्प होत होते. तसेच विविध राज्यांमध्ये नगरपालिका रचना वेगवेगळी होती, त्यात एकसमानता नव्हती

### 74 व्या घटना दुरुस्तीतील मुख्य तरतुदी :-

**1)** 74 व्या घटनादुरुस्तीने भाग IX-A : "नगरपालिका"संविधानात भाग IX-A (अनुच्छेद 243-P ते 243-ZG) समाविष्ट केला.

**2)** या घटना दुरुस्तीने 3 प्रकारच्या नगरपालिका अनुच्छेद 243-Q नुसार नगरपालिका परिषद (Municipal Council), मध्यम आकाराच्या शहरांसाठी नगरपंचायत (Nagar Panchayat), संक्रमण अवस्थेतील ग्रामीण-शहरी क्षेत्रांसाठी,महानगरपालिका (Municipal Corporation) मोठ्या शहरांसाठी अशी रचना करण्यात आलेली आहे.

### 3) रचना व सदस्य :-

74 व्या घटनादुरुस्तीने नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सदस्यांची निवड ही जनतेकडून प्रत्यक्षात केल्या जाते.सदस्यांची थेट निवड लोकाकडून होते. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये आरक्षण देखील निश्चित करण्यात आलेली आहे. त्यामध्ये SC, ST, OBC व महिलांसाठी किमान 33% आरक्षणाची तरतूद करण्यात आलेली आहे. तसेच यांचा कालावधी पाच वर्षाचा असून विसर्जनानंतर 6 महिन्यांत राज्य निवडणूक आयोगाने निवडणुका घेणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

### 4) महापौर व अध्यक्ष पद :-

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये महानगरपालिका नगरपरिषद नगरपंचायत व नगरपालिका यांचा राज्यकारभार चालवण्याकरिता महापौर, सभापती किंवा अध्यक्ष निश्चित करण्यात येतो. यांची निवड प्रत्यक्ष जनतेकडून पाच वर्षा करिता होत असते. पाच वर्षानंतर पुन्हा नव्याने निवडणुका घेतल्या जातात. अशा स्थानिक स्वराज्य संस्थांना आपल्या क्षेत्रात प्रभावीपणे कार्य करता यावे, याकरिता घटनेने पाच प्रकारचे वित्तीय अधिकार प्रदान केलेली आहे अनुच्छेद 243-X, 243-Y नुसार कर लावण्याचे अधिकार, राज्य वित्त व्यवस्थापन करून अनुदान वाटप करणे. राज्य सरकारच्या महसुलातून हिस्सा वाटप. वित्तीय पारदर्शकता व उत्तरदायित्व वाढवणे. इत्यादी महत्त्वपूर्ण वित्तीय अधिकार या संस्थांना प्राप्त होतात.

### 5) नगरपालिका नियोजन :-

**राज्यघटनेतीलअनुच्छेद 243-ZE नुसार :** महानगरपालिकेसाठी महानगर नियोजन समिती (Metropolitan Planning Committee — MPC) जिल्हा नियोजन समिती (District Planning Committee — DPC) निर्माण करण्यात आलेली असल्यामुळे,शहराच्या विकास आराखड्याला संस्थात्मक स्वरूप मिळाले.

**6) कार्य व जबाबदाऱ्या :-**

राज्यघटनेतील बाराव्या अनुसूचीमध्ये 18 विषय दिले (शहर नियोजन, रस्ते, जलपुरवठा, स्वच्छता, आरोग्य, सार्वजनिक सुविधा, वाहतूक, पर्यावरण संरक्षण इ.) कार्य करण्याचा अधिकार शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांना प्राप्त होतो.

**74 व्या दुरुस्तीचा परिणाम :-**

या घटना दुरुस्तीने नागरिक स्थानिक स्वराज्य संस्थांना एक घटनात्मक स्थान प्राप्त झाले. पूर्वीपेक्षा नागरिक स्थानिक स्वराज्य संस्था अधिक मजबूत व सक्षम बनु लागल्या या घटना दुरुस्तीचे काही परिणाम पुढीलप्रमाणे.

**1) लोकशाहीकरण :-**

या घटना दुरुस्तीने नागरी भागातील शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये लोकप्रतिनिधींचा सहभाग वाढला. महिलांना देखील 33 टक्के आरक्षण निश्चित करण्यात आल्यामुळे महिलांचे प्रतिनिधित्व मोठ्या प्रमाणात वाढले.

**2) विकेंद्रिकरण :-**

74 व्या घटनादुरुस्तीने सत्तेचे विकेंद्रीकरण करण्यात आले. शहरी भागातील स्थानिक स्वराज्य संस्थांना राज्यघटनेनुसार अधिकार दिले असल्यामुळे, प्रशासन राज्याकडून स्थानिक संस्थांकडे देण्यात आले.व तसेच शहरी भागातील नागरिकांचा सहभाग वाढला.

**3) शहर विकास योजनांमध्ये पारदर्शकता :-**

शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये DPC व MPC स्थापन झाल्याने दीर्घकालीन विकास आराखडे तयार करण्याची क्षमता वाढली. शहरी भागातील प्रत्येक प्रश्नावर गंभीरपणे विचार करून त्या सोडवण्यासाठी मोठ्या प्रमाणात प्रयत्न करण्यात येऊ लागले. नाले, सांडपाणी, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, दिवाबत्ती, सार्वजनिक ठिकाणी वाचनालय, मनोरंजन स्थळे, सभागृहे. इत्यादी समस्येवर विचारविनिमय करून ते सोडवण्यासाठी प्रयत्न केला जात असे.

**4) आर्थिक सक्षमता :-**

आर्थिक सक्षमते शिवाय कोणत्याही संस्थांना कार्य करणे अशक्य ठरते. त्याकरिता नगरपालिका यांची कर, शुल्क व अनुदाने यांमुळे आर्थिक शक्ती वाढली.तरी अनेक नगरपालिका आजही आर्थिकदृष्ट्या कमकुवत आहेत.

**मुख्य अडचणी आणि अपयश :-**

असे जरी असले तरी अनेक नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना आपले कार्य करत असताना त्यांना काही मुख्य अडचणी किंवा विविध समस्यांचा सामना करावा लागतो. पुढील प्रमाणे

1. वित्तीय स्वायत्ततेचा अभाव अनेक राज्ये नगरपालिका कराधान मर्यादित ठेवतात.

2. राज्य सरकारचे अत्यधिक नियंत्रण व अधिकारांचे पूर्ण विकेंद्रीकरण झालेले नाही.
3. राज्य वित्त आयोगांची कमकुवत अंमलबजावणी
4. नगरपालिका कर्मचाऱ्यांची अपुरी संख्या व कौशल्य शहरी प्रशासनाच्या गरजांना पुरेसे प्रशिक्षण व मनुष्यबळ नाही.
5. नियोजन समित्यांचे कार्यक्षमता अभावाने कार्य अनेक राज्यांत DPC/MPC प्रत्यक्षात कार्यरत नाहीत.
6. राजकीय हस्तक्षेप प्रशासकीय निर्णयांमध्ये राजकीय हस्तक्षेप वाढला.

## निष्कर्ष :-

लोकमान्य टिळकांचा सांस्कृतिक राष्ट्रवाद अभ्यासल्यानंतर आपणाला असे म्हणता येते,की त्यांचा सांस्कृतिक राष्ट्रवाद भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा नवा आधारस्तंभ आणि भारतीय राष्ट्रभावनेला दीर्घकालीन दिशा देणारा ठरला. तसेच भारतीयांमध्ये इतिहासाबद्दल स्वाभिमान निर्माण करण्यात महत्वपूर्ण योगदान दिले. भारतात धर्माचे राष्ट्रीयकरण करून समाजामध्ये गणेश उत्सव व शिवत्सव यांचे राजकीयकरण करून समाजामध्ये एकतीची ज्योत पेटवण्याचे काम टिळकांनी केले त्याबरोबरच भारतीयांमध्ये स्वाभिमान आणि कर्मयोग निर्माण करण्यात देखील संस्कृतीत राष्ट्रवादीचे योगदान महत्त्वपूर्ण राहिलेले आहे.

## संदर्भ ग्रंथ :-

1) भारतीय राज्यघटना स्वरूप व राजकारण - चि ग घांग्रेकर
2) भारताचे शासन व राजकारण - प्रा. एरंडे डॉ. इंगोले
3) भारतीय शासन व राजकारण - डॉ भा. ल. भोळे
4) भारताचे शासन आणि राजकारण - डॉ.अलका देशमुख
5) भारत का संविधान - प्रो. जी. एस. पांडेय
6) भारतीय राज्य व शासन - रा.ज. लोटे